# प्रेस नोट

## ॲन्टी करप्शनच्या ठाणे घटकाकडून सिंधुदुर्ग मधील जिल्हा परिषद विभागाच्या सावंतवाडी तालुक्यातील ग्रामपंचायत मळगाव ग्रामविकास अधिकारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक/युनिट | ॲन्टी करप्शन विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे,<br>ॲन्टी करप्शन विभाग सिंधुदुर्ग युनिट |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद कमांक | सावंतवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. /२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| तक्रारदार | पुरुष वय ६४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. ज्ञानदेव सिताराम चव्हाण वय ५१ वर्षे<br>ग्रामविकास अधिकारी मळगांव ता. सावंतवाडी |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६०,०००/– ( साठ हजार रुपये ) |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४०,०००/– ( चाळीस हजार रुपये ) |
| स्विकारलेली लाच रक्कम | ४०,०००/– ( चाळीस हजार रुपये ) |
| पडताळणी दिनांक | दि. २२/०८/२०२५ |
| सापळा दिनांक | दि. २२/०८/२०२५ |
| ठिकाण | रेणुका हॉटेल सावंतवाडी |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | दिपक माळी, पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग युनिट, मो.नं.८६००४९५४२६ |

**थोडक्यात हकीगत :-** यातील तक्रारदार यांचे मळगांव रस्तावाडी ता. सावंतवाडी येथील वृक्षवल्ली गृहनिर्माण प्रोजेक्ट मधील विक्री केलेल्या सदनीका पैकी १२ ग्राहकांचे घरपत्रक बदल करुन देण्यासाठी एकुण ६०,०००/- रु. लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक २१/०८/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २२/०८/२०२५ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, लोकसेवक श्री. ज्ञानदेव सिताराम चव्हाण वय ५१ वर्षे ग्रामविकास अधिकारी मळगांव ता. सावंतवाडी यांनी ४०,०००/– रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दिनांक २२/०८/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री. ज्ञानदेव सिताराम चव्हाण वय ५१ वर्षे ग्रामविकास अधिकारी मळगांव ता. सावंतवाडी यांनी तक्रारदाराकडून रेणुका हॉटेल सावंतवाडी येथे ४०,०००/. रुपयाची लाच घेतली असता त्यांना पंचासमक्ष ला.प्र. वि. सिंध्धुदुर्ग पथकाने रंगेहात पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचेविरुध्द सावंतवाडी पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. शिवराज पाटील ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय गोवीलकर ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग युनिटने केलेली आहे.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यक्तिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयातील खालील नमूद कमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिवराज पाटील पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. परिक्षेत्र ठाणे यांनी केले आहे.

१) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे दुरध्वनी कमांक :- ०२२ - २०८१३५९९
२) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग युनिट दुरध्वनी कमांक : - ०२३६२ - २२२२८९
३) टोल फ्री कमांक - १०६४,
४) वेबसाईट :- www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार :- www.acbmaharashtra.net.in

( विजय पांचाळ )
पोलीस उप-अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग